www.irjhis.com

ISSN : 2582-8568
Impact Factor : 5.71

IRJHIS

# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES

(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)

Volume 2, Issue 7, July 2021

SHREYAS PUBLICATION, AURANGABAD

Off. Principal
Late N.P.W. College

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# ग्रामीण साहित्याची मुलभूत प्रेरणा - एक संक्षिप्त आढावा

**प्रा. चंद्रशेखर सुधाकर देवघरे**

सहायक प्राध्यापक,
मराठी विभाग
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, लाखनी जि. भंडारा
E-mail: geogharechandrashekhar@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/07.2021-14964947/IRJHIS2107014**

**प्रस्तावना :**

आजवर अनेक साहित्यप्रकार व साहित्य प्रवाह उदयास आले आणि काळानुरूप त्यात अनेक स्थित्यंतरे ही घडत गेली. त्यात प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर आधारित ग्रामीण साहित्य हा वाड्मय प्रकार ह्याच आधुनिक काळात मराठीत साकारला गेला. तेव्हा ह्या साहित्याचा निर्मिती मागील प्रेरणा लाभली आहे ते पाहणे आवश्यक ठरेल. खालील प्रस्तावित मुद्यांद्वारे ग्रामीण साहित्याचा संक्षिप्तपणे आढावा घेतलेला आहे.

**ग्रामनिष्ठ जाणिवा व्यक्त करणे :**

कोणत्याही साहित्यप्रवाहाचा **पृथकपणा समजून** घेण्यासाठी त्या त्यासाहित्यप्रवाहात व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरूप पाहणे आवश्यक असते. ग्रामीण साहित्याचा पृथकपणा त्यातील 'ग्रामीणते' च्या जाणिवेमध्ये आहे. ग्रामीण भागातील शिकलेल्या पिढीत 1960 च्या आगेमागे सांस्कृतिक भान आले 'आपण अनुभवलेले, अनुभवीत असलेले खेडे आणि जीवन साहित्याचा विषय होऊ शकतो. आपण वाचतो ते प्रस्थापित मराठी साहित्य समग्र मराठी जीवनाचे चित्रण करीत नाही. खरे तर, खेड्यात राहणारी माणसे आणि शेती, निसर्ग, पशुधन, ऋतुचक्र, पिके जमिनीचा प्रकार, जलसंधारण यांचा अतूट संबंध असतो. त्यांचे सण, उत्सव, जत्रा, पूजा, विधी, धातुक्रिया, रीतीरिवाज, आहार, पाहुणचार, वेशभूषा यांचा वरील घटकांशी अतूट संबंध असतो. शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, आलुतेदार यांचा परस्परावलंबी अतूट संबंध असतो. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय संबंध आणि जाती अंतर्गत संबंध व धर्मांतर्गत संबंध सलोख्याचेच असतील किंवा द्वेषाचेच असतील असेही नव्हे, व्यक्तिपरत्वे हे संबंध निश्चित होत असतात. ग्रामीण माणसाचे, त्याच्या काळीआईवरील, पिकांवरील झाडांवरील, पशुधनावरील घनिष्ठ प्रेम आणि जिव्हाळा लक्षणीय असतो. शेतकरी आणि शेतमजूर यांचे हितसंबंधाच्याबाबतीत विरोधाचे संबंध असले, तरी त्यांचे शेलावर, पशुधनावर सारखेच घनिष्ठ प्रेम असते. याचा बारकाव्याने शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची



Principal
Late N.P.W. College
Lakhani Dist. Bhandara

प्रेरणा आहे. ग्रामीण गीतांच्यामध्ये आदिम कृती-प्रवृत्तीच्या खुणा आढळतात.

ग्रामीण जीवन काबाडकष्टांचे हालअपेष्टांचे असते, हे खरे पण त्या जीवनातही आनंदाचे क्षण असतात. सुखाच्या स्मृती असतात. सौंदर्यस्थळेही असतात. पावसाळ्याची सुरुवात, मृगातील पहिल्या सरीचा मृद्गंध, बियांतून तरारणारे कोंब, अंकुरांचा जोमदारपणा. तेज आणि कोवळ्या पानांची नक्षी व रंगछटा, सुगीचे दिवस, कामांची धांदल, जत्रा आणि इतरही प्रासंगिक कार्यक्रमातील लेझिम, टिपऱ्या, कुस्त्या, भजने, भारूडे, सोंगे, लोककलावंतांचे खेळ यामुळे कष्टमय जीवनात आनंद, उत्साह, जल्लोष आणि चैतन्य निर्माण होते. ग्रामीण स्त्रिया तर कष्टाचीच प्रतिमा आहेत. घरकाम, शेतीकाम आणि सासुरवास यातून त्या सोशिक, सहनशील, संयमी आणि अबोल किंवा मितभाषी होतात. त्यामुळेच स्त्रियांची भाषा अर्थवाही, अर्थघन आणि नेमकेपणाने आशय व्यक्त करणारी असते. शिवाय त्यांचे आपल्या कुटुंबीयावर असीम प्रेम असते. दुधाच्या सायीपासून शेणाच्या पोवटी त्यांचे भावसंबंध गुंतलेले असतात. प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याचे चिवट बळ त्यांनी आत्मसात केलेले असते. प्राचीन काळी शेतीचा शोध स्त्रियांनी लावला आणि त्यांच्याच कष्टावर शेती तरली आहे. स्वतः सर्जनक्षम असलेली स्त्री, कृषीच्या सर्जनक्रियेत सहभाग घेते आणि कला प्रांतात तिने प्रवेश केला तर तेथेही सर्जनशीलतेचा सहजाविष्कार उत्कटतेने घडविते. या सर्व ठिकाणी 'ग्रामीणता' आहे या ग्रामीणतेचा शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**कृषिनिष्ठ संस्कृतीचा कलात्मक आविष्कार घडविणे :**

'ग्रामीणता' ही व्यापक संज्ञा आहे. कृषि व्यवसाय ग्रामीणतेत समाविष्ट होतो. शेतकरी, शेतमजूर, बलुते आलुते यांचे परस्पर संबंध शेतीमुळे परस्परांशी घट्ट आवळलेले आहेत. यांत्रिकीकरणाच्या रेट्यामुळे जुनी गावगाडा पद्धती मोडकळीस आली आहे. पण संपूर्ण झाली नाही, शेती, पिके, उत्पादन पद्धती, अतिवृष्टी, अनावृष्टीचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम यामुळे रंकाचा राव आणि रावाचा रंक होतो. ग्रामीण जीवनातले हे चढ-उतार पाहणे अतिशय महत्त्वाचे असते. ग्रामीणतेचा ग्रामीण माणसांचा विचार शेती आणि त्यांचे पशुधन जनावरे वगळून करता येत नाही. शेती आणि जनावरांची कोणत्याही कारणाने परवड होऊ लागली, शेतकऱ्यांना अन्न गोड लागत नाही. तोंडातील घास घशाखाली उतरत नाही. ही शेतीनिष्ठा बदलत्या काळात बदलत आहे. शहराजवळील खेड्यातील शेतकरी शेतीचे प्लॉटींग करून विकत आहेत. शेती विकणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनातील ताणतणाव, त्यांची आर्थिक स्थिती यांचा शोध घेणे ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. शेती आणि शेतीवर निर्वाह करणारा संबंध समाज ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. शेती आणि शेतीवर निर्वाह करणारा संबंध समाज ग्रामीण साहित्याचा विषय आहे. त्यांचे जगणे, हर्षखेद, सुख दुखे मराठी साहित्यात अस्सलपणे आली पाहिजेत. मराठी भाषिक समाजात ग्रामीण समाज हा बहुसंख्य आहे. पण त्याचे जीवन, त्याची बोलीभाषा उच्चभ्रू साहित्यिकांनी टिंगलीचा, हेटाळणीचा, थट्टेचा, कुचेष्टेचा विषय केला होता. कृषिनिष्ठ जीवन जगणारे भूमिपुत्र आणि भूमिकन्या या मराठी साहित्यात नायक-नायिका झाले पाहिजेत, यासाठी त्यांच्या जीवनवास्तवाचा शोधघेत घेत त्यांच्या व्यथा-वेदनांचा हुंकार साहित्यातून आविष्कृत करणे, ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या संबंधाचा शोध घेणे :**

ग्रामीण माणसांचा आणि निसर्गाचा अतूट संबंध आहे. ग्रामीण माणसे निसर्गाचीच लेकरे आहेत. ती निसर्गाच्या

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

अंगाखांद्यावर खेळतात. निसर्गाशी त्यांचे नाते. कोडकौतुक करतो. कधी हाडं कापरं. शेतीचा विसावा पर. पिकांची समृद्धी आकाशाची गूढ निळाई. पक्ष्यांची अज्ञात बोली. फुलं झाडांच्या खोड. पावसाच्या सरी. विहिरीचे संगीत. ढगांची चित्रं चंद्र-तारकांची शोभा. बैलांच्या गळ्यातील घुंगरमाळांचा मधुर नाद. आत्म्याची धारा. मनाचे आवाज. ऋतुचक्राचे सौंदर्य त्या त्या ऋतूतील पिके आणि वृक्षवल्ली. त्यांच्या पानांची, फुलांची शोभा. ... या काळाची जादू. धावरी गीते यांची बेहोशी निसर्ग अशी रस, रूप, रंग, गंध आणि नादांची अपार्थिव उधळण करतो. खेड्याच्या आणि शेताच्या ओढा असलेल्या माणसाला शहरात करमत नाही. याचे महत्त्वाचे हे कारण आहे. निसर्गाशी सहकार्य, निसर्गाशी सहकार्य अशा मैत्रीच्या संबंधाप्रमाणे विरोधाचे ही संबंध असतात. अनावृष्टी, अतिवृष्टी, गारपीट, पिकांवरील अनावर कीड यांसारख्या निसर्ग-कोपाला ग्रामीण माणसा धैर्याने तोंड देतात. निसर्गाशी संघर्ष करताना ग्रामीण माणूस कधी कधी पार कोसळून, उन्मळून पडतो. निसर्ग आणि ग्रामीण माणसांच्या या संबंधाचा शोध घेणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. अलीकडे निसर्गाच्या ऋतुमान व स्वरूपात बदल झाले आहेत. पाऊस काळ नाही. वाहणारे ओढे नाहीत. आणि ... कोरडे गेले. आभाळाच्या ... हिरवीगार करीत होत्या त जिवाभावाच्या सख्या ... होत आहे कारण सर्व ... यांसारखे पाळीव प्राणी शेतात दिसत नाहीत. यंत्रांच्या आगमनामुळे बैल आणि त्यांच्या जुन्या घुंगुरमाळा, त्यांचे गोठे ... यांच्या आठवणी गेल्या गेल्याचे दुःख नाही. पण जे सर्व येत आहे त्याचे तरी स्वागत कसे होत आहे? त्या येणाऱ्या ... परिणाम ग्रामजीवनावर कसे होत आहेत? हे समजून घेणे, त्यांचा आविष्कार करणे ही ग्रामीण साहित्यनिर्मितीची प्रेरणा आहे. ... ग्रामीण माणसे काम करतात त्यामुळे त्यांच्यातही रुक्षपणा, कोरडेपणा, व्यापारी वृत्ती, स्वार्थ वाढत आहे आणि त्याचा आविष्कार होत आहे. एकीकडे कायमची धरणं, कोरड्या विहिरी आणि दुसरीकडे अफाट ग्रामीण जनसमुदाय ही संज्ञा येथे व्यापक अर्थाने घेणे उचित ठरेल. कारण आदिवासी, दलित, शेतमजूर, ग्रामीण स्त्रिया, ग्रामीण भागातून शहरात आलेले ... आणि कामगार यांचाही समावेश ग्रामीणामध्ये होतो. ग्रामीण भागातून शहरात स्थलांतरित झालेल्या जनसमूहाची मानसिकता दुभंगलेली आहे. ते खेड्यापासून तुटतात आणि शहरे त्यांना सामावून घेत नाहीत. या संघर्षात ते अडकलेले असतात. या मानसिकतेचा आविष्कार करणे ही देखील ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**ग्रामीण समाजाची व्यामिश्रता समजून घेणे :**

मराठी भाषिक ग्रामीण समाज बहुविध आहे. अनेक धर्म, जाती, वंश, संप्रदाय येथे एकत्र राहतात. त्यांचे संस्कार भिन्न असतात. जीवनात मानसिकतेची ... भिन्नता होत असते. ... समाज शूर, भित्रा, सुष्ट-दुष्ट, कष्टाळू, आळशी, दयाळू-क्रूर, पुरोगामी, प्रतिगामी असे ढोबळ मानाने मानले जाते. तेही फार खरे नसते. ग्रामीण साहित्याला विशिष्ट तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान नाही, असे विधान केले जाते. तेही फार खरे नसते. अशा व्यामिश्र, बहुविध, अफाट असलेल्या, दूरवर पसरलेल्या आणि निरक्षर असलेल्या सर्वच समाजाला कोणा एकाच महात्म्याचे तत्त्वज्ञान स्वीकारार्ह कसे वाटेल? प्राचीन काळापासून ही बहुविध संस्कृतीची माणसे येथे एकत्र नांदत आली.

वाद-संवाद, संघर्ष समेट होत आले. वेश आणि पूजा पद्धती यांत देवाण-घेवाण झाली. वर्ण, जाती, धर्म, संप्रदाय यांत संकर झाले. पण आपापल्या वेगळेपणा जपण्याचा आटापिटा चालूच राहिला. भाऊबंदांची भाऊबंदकी, मारामाऱ्या, खून ग्रामीण साहित्य ये होतात. काटेकचेऱ्याही होतात. संघर्ष आणि सलोखा हे मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. हैदराबाद मुक्ती संग्रामात



Off. Principal
Late N P W College
Lakhani Dist Bhandara

अनेक हिंदूनी मुसलमानाना आपल्या घरात लपवून जीवनदान दिले. हिंदूच्या घरात मुसलमान लपविल्याची कुणकुण लागली तेव्हा हिंदूच्या घराच्या झडत्या घेतल्या गेल्या. त्यावेळी मुसलमान स्त्री-पुरुषांना कुंकू आणि गंध लावून हिंदुनीच त्यांचे प्राण वाचविले हो करुणा वृत्ती माणसात असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासारख्या जातिसंघर्षाच्या लढ्यात सवर्णानी दलितांवर हल्ले केले आणि काही काही सवर्णांनीच हल्लेखोरांना रोखले देखील हा फार जुना इतिहास नाही. एवढेच नव्हे तर अनेक सवर्ण माणसे या लढ्यात ठामपणे दलितांच्या न्याय्य बाजूने उभी राहिली. झाशीच्या राणी आणि साताऱच्या ताराबाई यांच्यासारख्या शौर्य गाजविणाऱ्या स्त्रिया आजही आहेत. हैदराबाद मुक्तीसंग्रामात बदूक घेऊन लढल्या आहेत. त्यांच्यासारख्या काही स्त्रियांनी भूमिगत योद्धांना शस्त्रास्त्रे पुरविणे, शस्त्रास्त्रांची ने-आणे करणे, बॉब तयार करण्यासाठी मदत करणे इ. मर्दानी कामे केली आहेत. स्त्रियांनी मर्दानी गाजविली तसेच दुबळ्या शेतकऱ्यांनी लाठ्या-काठ्या, कुऱ्हाडी, गोफणी आणि रुमण्यांनी निजाम रझाकारांशी सामने केले आहेत. अशी बहादुरी गाजविणारा ग्रामीण समाज, चिल्लर पुढारी आणि क्षुद्र सरकारी कर्मचाऱ्यांसमोर लाचार होऊन का उभा राहतो, याचा शोध घेण्याची ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.हा अफाट, सर्वदूर पसरलेला, असंघटित असलेला व्यामिश्र ग्रामीण समाज परिवर्तनाला सन्मुख करावयाचा आहे. त्यांना म. जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ यांचे विचार आणि कार्य सांगावे लागेल. तसेच या श्रद्धाळू समाजाला म. गौतम बुद्ध, म. कबीर, ज्ञानदेव, नामदेव, चोखा, सावता, सेना, गोरोबा, रोहीदास, तुकाराम, एकनाथ यांचेही विवेकनिष्ठ विचार समजावून सांगावे लागतील, ही परंपरा संत तुकडोजी, गाडगे महाराजांपर्यंत बहुजनांच्या उद्धारासाठी झटत होती. काळाच्या मर्यादा लक्षात घेऊन त्यांचे कालबाह्य विचार सोडून, जे विचार आजही महत्त्वाचे आहेत. ते भाविक समाजापुढे आणणे आवश्यक आहे. मराठी मनावर वारकरी संप्रदायाचा फार मोठा प्रभाव आहे. मराठी मनावर वारकरी संप्रदायाचा फार मोठा प्रभाव आहे. व्यामिश्र आणि बहुविध समाजाला एकसंघ करणे, ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**बदलत्या खेड्याचा वेध घेणे :**

'खेडी बदलत आहेत' याचाही अर्थ नीट समजून घेण्याची गरज आहे. खेड्यात कच्च्या पक्क्या सडका, शाळा, दवाखाने, ग्रामपंचायती, सहकारी संस्थांच्या इमारती, काही सरकारी कार्यालये यांची आधुनिक पद्धतीची कॉंक्रीट गिलाव्याची बांधकामे, गावात एस. टी. बस सेवा, ट्रक, ट्रॅक्टर, जीप गाड्यांची वाहतूक, रेडिओ, वृत्तपत्रे, दूरदर्शन, टेलिफोन, वीज, विजेवर चालणारी यंत्रे, शहरी पोशाख, राहणीमान एवढाच हा वरवरचा बदल नाही. शेतीत आधुनिक अवजारे, यंत्रे गेली. बी-बियाणे, रासायनिक खते, आहार पद्धती, चैन, सुख, करमणूक, ऐश्वर्य याविषयीही शहरी जाणिवा खेड्यात पोहोचल्या आहेत. स्वाभाविकपणे ग्रामीण भाषेवरही शहरी मराठी आणि इंग्रजीचे आक्रमण होत आहे. ग्रामीण माणसाची मानसिकता त्या वळणाची बनत आहे. खेड्यात हॉटेल, परमिट रूम, बिअरबार, व्हिडीओ-शो, पानपट्ट्या आहेत. दूरदर्शन आणि व्हिडीओ-शो रूममध्ये हिंसक, लैंगिक, भडक कार्यक्रम तरुण वर्ग आणि सर्वचजण एकजात पाहत आहेत.

खेड्यात वीज पोहोचल्यापासून शेतीवरचा खर्च वाढला आहे. सामान्य शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. ती सोडताही येत नाही. कसताही येत नाही. शेती विकावी तर काय करावे ? हा प्रश्न आहे. बी, खते, कीटकनाशके, अवजारे, यंत्रे यांचे खेड्यात वीज पोहोचल्यापासून शेतीवरचा खर्च वाढला आहे. सामान्य शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. ती सोडताही



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt.

कारखानदार आणि व्यापारी भरमसाट किमती आकारून शेतकऱ्यांची लूट करतात. त्यातही मालात भेसळ, अप्रामाणिक व्याज, राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारांना राजकीय प्रतिष्ठाप्राप्ती ! शेतकऱ्यांचा कोणी वाली नाही. पुढारी आणि अधिकारी-कर्मचारी शेतकऱ्यांनाच लुटीत आहेत. ग्रामीण योजना हडप होतात. ग्रामीण लोकांना रोजगार स्वस्त धान्य दुकानातून धान्य, पिण्याचे पाणी मिळत नाही. न्याय करणारेच अन्याय करतात. तेथे तक्रार कोणाकडे करायची ? "बदलते खेडे, जगण्यामरण्याचे कोडे' अशी स्थिती झाली आहे.

बदलत्या खेड्याची दुसरीही विधायक बाजू आहे. आधुनिक शेती अवजारे . वीज . यंत्रे यामुळे कमी दर्जेदार शेतीकामे होतात. अनेक ग्रामीण कुटुंबांतील शिक्षितांना निरनिराळ्या क्षेत्रांत नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्यामुळे बदलत्या खेड्याची दुसरीही विधायक बाजू आहे. आधुनिक शेती अवजारे, वीज, यंत्रे यामुळे कमी कष्टात जास्त आणि कायम उत्पन्नांची सोय झाली. त्यांच्यामुळे इतरांना शिक्षणाच्या संधी निर्माण झाल्या. कल्याणकारी धोरणामुळे रोजगार हमी, जवाहर योजना, इंदिरा आवास योजना आणि अनुदान योजना आहेत. त्यांचाही काही प्रमाणात ग्रामीण जनतेला लाभ झालेला आहे. तरीही पुढारी अधिकारी यांच्या सलगीने चालणारा भ्रष्टाचार, लोकांमध्ये जागृतीचा अभाव,असंघटितपणा, आर्थिक दुर्बलता आणि परावलंबित्व यामुळे फार मोठा ग्रामीण समाज या लाभांपासून खूप दूर आहे. या सर्व अनुकूल-प्रतिकूल बदलांचा परिणाम ग्रामीण माणसांवर होत आहे. वैफल्य, निराशा, लाचारी वाढत आहे. विफल शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तसेच विद्रोह होत आहेत. ही बदलती मानसिकता ग्रामीण साहित्यात प्रतिबिंबित करण्याची पेरणा ग्रामीण साहित्याची आहे.

**ग्रामीण समाज आणि प्रसारमाध्यमे यांचा संबंध:**

प्रसारमाध्यमे ही आधुनिक समाज जीवनाचा अविभाज्य भाग बनलेली आहेत. सर्व पकारची प्रसारमाध्यमे खेड्यापर्यंत पोहोचली आहेत. लहान खेड्यांचे मोठ्या गावात मोठ्या गावांचे लहान शहरात रूपांतर होत आहे. शेती, नोकरी, मक्तेदारी, व्यवसाय, व्यापार यांद्वारे खेड्याकडेही पैसा जात आहे. खेड्यातील सधन घरात फ्रीज, मिक्सर, ग्राइंडरसह डायनिंग टेबलासारख्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. स्वतःची गाडी, टू-इन-वन, दूरदर्शन, टेलिफोन असतो. भाषा, वेश, आहार, चैन, मनोरंजन याबाबतीत खेडे आणि शहर यांतील अंतर कमी होत आहे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, जाहिराती फोन यांमुळे अंतर कमी होत आहे. निरक्षर आजी-आजोबा अनेक इंग्रजी शब्द आणि यांत्रिक शब्द आपल्या भाषेत वापरतात. प्रसारमाध्यमांतून अनेक बदल होत आहेत. एकप्रकारचे हे सांस्कृतिक आक्रमण आहे. ही लादलेली, थोपवली जात असलेली आधुनिकता आहे. ते परिवर्तन नव्हे फॅड आहे. यातून अस्सल देशीपणा, स्वत्व नष्ट होण्याची भीती आहे. या अधःपतनापासून ग्रामीण समाज वाचवावा अशी धडपडही काही मंडळी, संस्था, संघटना करतात. हे सर्व सखोलपणे, सूक्ष्मपणे समजून घेऊन साहित्यातून आविष्कृत करण्याची ग्रामीण साहित्याची पेरणा आहे.

**समग्र समाजवास्तवाच्या संदर्भात ग्रामीण साहित्याचा विचार करणे :**

ग्रामीण समाज हा समग्र समाजाचा एक भाग आहे. तो सर्वात मोठा म्हणून महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण समाज म्हणजेच समग्र समाज आहे. तसेच ग्रामीण समाज म्हणजे काही स्वतंत्र अलिप्त समाज नव्हे. त्यामुळे ग्रामीण समाजाचा विचार समग्र भारतीयतेच्या संदर्भातच करावा लागतो. भारताच्या अस्मितेतच ग्रामीण समाजाची अस्मिता आणि भारताच्या हितातच ग्रामीण समाजाचे हित सामावलेले आहे. भारतीय विशाल समाजात अनेक धर्म, जाती, संप्रदाय, भाषा, सीमा, लिंगभेद आहेत.



Off. Principal
Late. N P W. College

त्यांच्यात अमर्याद बंदी आहे. त्या त्या समाजाच्या निरनिराळ्या जाणिवा आहेत. त्यांचा मुक्तपणा स्वतंत्र आविष्कार व्हावा म्हणून निरनिराळ्या साहित्य प्रवाहांची अपरिहार्यता आहे. ग्रामीण समाजाचे वास्तव प्रतिबिंब ग्रामीण साहित्य प्रवाहातच उमटेल, हे स्वाभाविक आहे. अंतिमतः समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा, भयमुक्त, शोषणविरहित समाजनिर्मिती व्हावी अशीच आकांक्षा ग्रामीण साहित्याची आहे. त्यामुळे सर्व समविचारी पक्ष, संघटना, साहित्यप्रवाह, सांस्कृतिक संस्था यांच्याशी ग्रामीण साहित्याचे भावंडपणाचे नाते आहे. ग्रामीण माणूस सर्व समाज, विश्व मानव याविषयी काय विचार करतो, हे आकलन करणे ही एक प्रेरणा आहे.

**संघर्षाच्या पवित्र्यात असलेल्या ग्रामीण समाजाची मानसिकता समजून घेणे** :

धार्मिक पातळीवर बुवाबाजी आणि ठकबाजी, राजकीय नेत्यांचे गुन्हे आणि स्वार्थांधता, सामाजिक कार्यकर्त्यांचे ढोंग वाढत आहे. यामुळे समाजापुढे नैतिकता, चारित्र्य, शील, त्याग, देशभक्ती, राष्ट्रप्रेम, समाजहिताची निष्ठा यांविषयीचे महान आदर्श नाहीत. काही सन्माननीय अपवादात्मक आदर्श आहेत; पण त्यांचा प्रभाव काही सर्वदूर पडत नाही. बोफोर्स, शेअरघोटाळे, हवालाकांड, भूखंड, वासनाकांड, दंगे, बलात्कार, अत्याचार नेहमीचेच झाले आहेत. स्थानिक पातळीवर वरील घटनांसारख्या लहान-मोठ्या घटना घडतात. यामुळे ग्रामीण समाजातील असंतोष, चीड, विद्रोह वाढत आहे. या घटनांचा प्रतिकार करण्यासाठी समाजाची धडपड आहे. पुढारी, अधिकारी यांच्याकडे सत्ता, संपत्ती एकवटत आहे. त्यातून त्यांचा मस्तवालपणा, मुजोरपणा, उर्मटपणा वाढत आहे. आमच्या जिवावर यांची सत्ता, संपत्ती आणि ऐश्वर्य वाढत आहे, ही जाणीव ग्रामीण समाजात वाढते. शिवाय चिल्लर पुढारी अधिकारी आमच्यापुढे रूबाब करतात आणि त्यांच्या आश्रयदात्यांच्या पायांवर लाचारपणे लोटांगणे घेतात, ही वस्तुस्थिती ते पाहतात. आपले नागरी हक्क समित्या, ग्रामीण विकास संघटना, संघर्ष समिती, कृतिसमिती स्थापन होत आहेत. त्यांची व्याप्ती, गाव, तालुका त्यापलीकडे अशी वाढत आहे. शेतकरी आंदोलने, युवक चळवळी, स्त्री-संघटना, दलित-मुक्ती लढे, शेतमजूर संघटना ही काही उदाहरणे आहेत. निराशा, बिघडलेल्या परिस्थितीत काही विधायक कामे यशस्वीपणे चालू आहेत. अण्णा हजारे यांचा राळेगणसिद्धी येथील प्रयोग, विलास साळुंखे यांची पाणी पंचायत, मोहन धारिया यांची वनराई चळवळ इत्यादी.

विधायक आणि रचनात्मक कार्याप्रमाणेच नागनाथ अण्णा नाईकवाडी, भारत पाटणकर, गोविंदराव पानसरे, मधुकर पातळीवरचे कार्यक्रम समाजाचा आशावाद जागवीत आहेत. संघर्षाचा हा पवित्रा, त्या प्रसंगीच मानसिक, बौद्धिक उलघाल वाहणे ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे.

**संदर्भग्रंथ :**


1) डॉ. यादव आनंद, ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव , मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे

2) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे

3) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद


Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

L. P. W. College, Lakhani, Bhandara